महाराष्ट्र शासन

# जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक

**(कुंभमेळा कक्ष)**

दुरध्वनी क्रमांकः-0253-2319006 Email ID :- mahakumbhnashik@gmail.com

**दिनांक**-16/07/2024

**प्रति,**

1. मा.आयुक्त मनपा नाशिक (सर्व विभाग प्रमुख)
2. मा.पोलिस आयुक्त नाशिक
3. मा.पोलिस अधिक्षक नाशिक
4. मा.मुख्यकार्यकारी अधिकारी नाशिक महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण (NMRDA NASHIK)
5. मा. अधिक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम नाशिक
6. अधिक्षक अभियंता लाभक्षेत्र विकास प्राधिकरण नाशिक (जलसंपदा)
7. मा.उपवनसंरक्षक पश्चिम विभाग नाशिक
8. मा.उपवनसंरक्षक पुर्व विभाग नाशिक
9. मा.उपवनसंरक्षक अहमदनगर
10. अधिक्षक अभियंता महाराष्ट्र विद्युत वितरण कं.मर्या., नाशिक शहर/ग्रामीण
11. सहसंचालक अन्न व औषध प्रशासन नाशिक
12. उपसंचालक आरोग्य सेवा मंडळ नाशिक
13. जिल्हा शल्य चिकीत्सक नाशिक
14. जिल्हा आरोग्य अधिकारी नाशिक
15. अधीक्षण पुरातत्व विभाग औरंगाबाद मंडळ
16. सहसंचालक महाराष्ट्र राज्य पुरातत्व विभाग नाशिक
17. कार्यकारी अभियंता राष्ट्रीय महामार्ग विभाग
18. उपसंचालक महाराष्ट्र पर्यटन विकास नाशिक
19. प्रादेशिक व्यवस्थापक महाराष्ट्र पर्यटन विकास नाशिक
20. उपप्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ
21. विभागीय व्यवस्थापक, महाराष्ट्र रार्ज्य मार्ग परिवहन महामंडळ नाशिक
22. जिल्हा क्रिडा अधिकारी
23. जिल्हा माहिती अधिकारी नाशिक

24. मुख्याधिकारी, त्र्यंबक नगरपरिषद

25. मुख्य कार्यकारी अधिकारी स्मार्ट सिटी मनपा नाशिक

26. व्यवस्थापक मध्य रेल्वे विभाग नाशिकरोड

27. व्यवस्थापक देवळाली कंन्टोंमेंट नाशिक

28. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी

**विषय :- सिंहस्थ कुंभमेळा सन 2026 – 2027 दि. 08/07/2024 व दि.10/07/2024 रोजी मा.विभागीय आयुक्त नाशिक यांचे उपस्थितीतील बैठकीचे इतिवृत्त**

**संदर्भ : - मा.उपआयुक्त (नियोजन) नाशिक विभाग,नाशिक यांचे कडील पत्र क्र.जा.क्र. नियोजन/आस्था/इतिवृत्त/2024 दि. 15/07/2024**

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये सिंहस्थ कुंभमेळा 2026 -2027 च्या नाशिक जिल्हयातील सर्वयंत्रणांचा प्रारुप आराखडा संदर्भात घेण्यात आलेल्या दि. 08/07/2024 व दि.10/07/2024 रोजी मा. विभागीय आयुक्त नाशिक विभाग नाशिक यांनी घेतलेल्या बैठकीचे इतिवृत्तांची प्रत यासमवेत जोडली आहे. सदर इतिवृत्तांत नमुद केलेल्या आपल्या विभागाशी सबंधित असलेल्या सुचनांप्रमाणे विहीत कालावधीत पुर्तता करुन अहवाल तात्काळ सादर करावा.

**प्रत – मा.विभागीय आयुक्त नाशिक विभाग नाशिक यांचेकडेस माहितीस्तव सविनय सादर.**

**(राजेंद्र वाघ)**
**निवासी उपजिल्हाधिकारी**
**जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक**

## 'सिंहस्थ कुंभमेळा' सन 2027 बाबत दिनांक 10 जुलै 2024 रोजी आयोजित करण्यात आलेल्या बैठकीचे इतिवृत्त.

नाशिक व त्र्यंबकेश्वर येथे सन 2027 मध्ये 'सिंहस्थ कुंभमेळा' चे आयोजन करणेसाठी डॉ. प्रवीण गेडाम, विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचे अध्यक्षतेखाली दिनांक 10 जूलै 2024 रोजी दुपारी 3.00 वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात विविध यंत्रणांनी तयार केलेल्या आराखड्याबाबत संपन्न झालेल्या आढावा बैठकीसाठी खालील अधिकारी उपस्थित होते.

- श्री जलज शर्मा, जिल्हाधिकारी, नाशिक,
- डॉ. राणी ताटे, उपआयुक्त (महसूल)
- श्री. मच्छिंद्र भांगे, उपआयुक्त (नियोजन)
- श्री. नितीन पवार, सहआयुक्त (नपा)
- श्री. राजेंद्र वाघ, निवासी उपजिल्हाधिकारी
- उपस्थित विभाग प्रमुख व इतर अधिकारी/ कर्मचारी यांची यादी सोबत जोडण्यात आली आहे.

मा. जिल्हाधिकारी, नाशिक यांनी प्रथम मा.विभागीय आयुक्त महोदय यांचे व बैठकीस उपस्थित सर्व अधिकारी/ कर्मचारी, कार्यान्वयीन यंत्रणांचे स्वागत करुन सिंहस्थ कुंभमेळा बाबत पार्श्वभुमी सांगितली. मा. अध्यक्ष महोदय यांनी उपस्थित सर्व अधिकारी/ कर्मचारी यांना आराखड्याचे विभागनिहाय सादरीकरण करण्याचे सांगितले. त्यातील प्रमुख सुचना पुढीलप्रमाणे अनुपालनास्तव नमुद करण्यात येत आहे. या शिवाय दिलेल्या इतर सुचनांची देखील अंमलबजावणी करावी.

| अ.क्र. | विभागीय आयुक्त यांनी दिलेले सूचना | अंमलबजावणी करणारा विभाग/ अधिकारी |
|---|---|---|
| 1 | आराखडयाचे नियोजन करतांना विभाग निहाय, काम निहाय प्राधान्यक्रम (Prioritisation) निश्चित करावा. | सर्व विभाग प्रमुख |
| 2 | निधी मागणी करतांना विस्तृत काम निहाय माहिती सादर करावी. | |
| 3 | आराखडयामधील कामे नकाशा मध्ये दर्शविणे व त्यांची माहिती PM गतीशक्ती आणि तत्सम GIS पोर्टलवर अंतर्भुत करणेसाठी त्याच्या योग्य अशा kml फाईल्स किंवा तत्सम फाईल्स तयार कराव्यात. | |
| 4 | आराखडा तयार करतांना (नद्या, डोंगर, जलाशय, वन आणि इतर नैसर्गिक बाबींचे संवर्धन आणि गरजेनुसार सुशोभीकरण तसेच) शक्यतो कुंभमेळयाशी सबंधित सांस्कृतिक/ पौराणिक थिम ठेवावी. | |
| 5 | नाशिक आणि नाशिक परिसर (उदा. त्र्यंबकेश्वर, कावनई, रामशेज, शिर्डी, सप्तश्रृंगी गड, इगतपुरी इत्यादी) या सर्व भागात पर्यटनाला चालना देण्यासाठी आणि एकीकडचे पर्यटक सहज दुसरीकडे जाऊ शकतील याद्दष्टीने उत्कृष्ट दर्जाचा महामार्ग/ द्रुतगती महामार्गाच्या मिसींग लिंक (उदा. शिर्डी-कोपरगांव, सिन्नर-नाशिक) करता येईल काय याचा विचार व्हावा, जेणेकरुन स्थानिक अर्थव्यवस्थेला या सर्व ठिकाणी चालना मिळेल. | जिल्हा परिषद, नाशिक.<br>सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक.<br>MSRDC, नाशिक. |

| अ.क्र. | विभागीय आयुक्त यांनी दिलेले सूचना | अंमलबजावणी करणारा विभाग/ अधिकारी |
|---|---|---|
| 6 | कुंभमेळयाच्या निमित्ताने स्थानिक पर्यटनाला मोठी चालना मिळू शकते. याबाबत धार्मिक पर्यटनाशिवाय निसर्ग, साहसी खेळ, वाईनरी, ॲग्रो, सांस्कृतिक, करमणुक अशा विविध प्रकारच्या पर्यटनाच्या दृष्टीने नाशिक पासून दोन तास अंतरावरील भागांचा पर्यटन आराखडा तयार करावा. (उदा. अकोले तालुका, सप्तश्रृंगी गड, इगतपुरी, शिर्डी, इ.) | MTDC.<br>जलसंपदा विभाग, नाशिक.<br>वन विभाग, नाशिक.<br>जिल्हा परिषद, नाशिक. |
| 7 | रामकुंड, कुशावर्त व गोदावरी वरील विविध घाट तसेच धार्मिक/ सांस्कृतिक दृष्टिने महत्वाची जागा यांचे सुशोभिकरण करताना कन्झरवेशन आर्कीटेक्ट यांच्या सल्ल्यानुसार सांस्कृतिक/ पौराणिक रुप देण्याचा प्रयत्न करावा. याद्दष्टीने दोन्ही शहरातील पर्यटनाची प्रमुख स्थळे जसेकी, फाळके स्मारक, प्लॅनिटोरियम, बॉटनिकल गार्डन, काळाराम मंदिर व इतर मंदिरे या सर्व ठिकाणी आवश्यक त्या सुधारणा/ कामे यांचा आराखडा तयार करावा. | त्र्यंबकेश्वर नगरपालिका.<br>मनपा, नाशिक.<br>स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड, नाशिक. (NMSSDCL) |
| 8 | कुंभमेळयाच्या पुर्वतयारीच्या विविध बैठकांमध्ये केलेल्या सुचना हया आपत्ती टाळण्यासाठी अथवा आपत्तीची तीव्रता कमी करण्यासाठी महत्वाच्या आहेत. त्यामुळे या बैठकीत दिलेल्या महत्वाच्या सुचनांचे आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 च्या तरतुदी नुसार अंमलबजावणी करण्याचे आदेश जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांनी निर्गमित करावे. आराखडयाचे नियोजन करतांना आपत्ती व्यवस्थापन अधिनियमच्या तरतुदी विचारात घेवून त्यानुसार प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात. | जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नाशिक.<br>जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक. |
| 9 | त्र्यंबकेश्वर मंदिर संस्थाकडडून भक्तनिवास, वाहनतळ, दर्शनरांग/ मंडप अशा पध्दतीची भाविकांना सुविधा पुरविणेकरिता त्यांचे निधीतून कामे करता येतील काय याचा विचार करावा. | त्र्यंबकेश्वर मंदिर समिती.<br>त्र्यंबकेश्वर नगरपालिका. |
| 10 | जी कामे एकापेक्षा अधिक विभागाशी सबंधित आहेत, ती सर्व विभागाने समन्वयाने करणे अपेक्षित आहे जेणेकरुन कामाची व्दिरुक्ती होणार नाही. उदा. CCTV, Public Address System यांचे काम पोलिस विभाग, महानगरपालिका आणि स्मार्ट सिटी सर्व मिळून करत आहे. त्यात एकसुत्रीपणा राबवूण व्दिरुक्ती टाळावी. | सर्व विभाग प्रमुख |
| 11 | सन 2003-04 च्या कुंभमेळयात झालेल्या दुर्घटनेची चौकशी करण्यासाठी गठित करण्यात आलेल्या व्हि. रमणि समितीने केलेल्या शिफारशी विचारात घेण्यात याव्यात. | जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक. |
| 12 | विविध विभागासाठी अतिरिक्त अधिकारी/ कर्मचारी मनुष्यबळ बाहेरुन मागविणेत येतात. (उदा. पोलीस, आरोग्य, आपत्ती व्यवस्थापन इ.) त्यांचे निवासाचे नियोजन करतांना प्राधान्याने भाड्याच्या जागेत करणे अपेक्षित असून त्यासाठी नव्याने इमारती बांधण्याचे टाळावे. निवासी व्यवस्थेसाठी आवश्यक असणाऱ्या खाजगी मालमत्ता या कायदेशीर पध्दतीने अधिग्रहित करणे शक्य आहे. त्याद्दष्टीने प्राधान्याने नियोजन करावे. | पोलीस विभाग, (शहरी आणि ग्रामीण), नाशिक.<br>सार्वजनिक आरोग्य विभाग, नाशिक.<br>आरोग्य विभाग, जि.प., नाशिक. मनपा, नाशिक. |

| अ.क्र. | विभागीय आयुक्त यांनी दिलेले सूचना | अंमलबजावणी करणारा विभाग/ अधिकारी |
|---|---|---|
| 13 | प्रवास व्यवस्था एकापेक्षा जास्त विभागाशी संबंधित असू शकते. उदा. रेल्वे, एस.टी महामंडळ, शहर बस सेवा यांनी नियोजन करताना भाविकांना सुविधा होईल याची दक्षता घ्यावी. उदा. रेल्वे स्टेशनवर जास्तीत जास्त जवळ बस सेवा असणे अपेक्षित आहे. | MSRDC, नाशिक.<br>मनपा, नाशिक.<br>डिव्हीजनल रेल्वे मॅनेजर, भुसावळ.<br>प्रादेशिक परिवहन कार्यालय, नाशिक |
| 14 | शहरामधील रस्त्याचे नियोजन करताना आवश्यक त्या रुंदीचा फुटपाथ, गरजेनुसार रोड डिव्हायडर व इतर रोड फर्निचर तसेच भरपूर प्रमाणात वृक्ष लागवड या सर्व बाबींचा विचार करावा. तसेच रस्त्यांचे विविध पर्याय (उदा. डांबरी, व्हाईट टॉप, क्राँकीट इ.) यांचाही विचार करावा. सर्वत्र एकसारखे मानकं (standard) राहतील, याची काळजी घ्यावी. | त्र्यंबकेश्वर नगरपालिका.<br>मनपा, नाशिक.<br>सा.बां. विभाग, नाशिक.<br>MSRDC, नाशिक.<br>जिल्हा परिषद, नाशिक.<br>NMSSDCL, नाशिक |
| 15 | ज्या रस्त्यांची कामे कुंभमेळा आराखडयात प्रस्तावित नाहीत त्या भागांबाबत आवश्यक ते सुशोभिकरण, रंगरंगोटी यांची तरतुद करावी. | त्र्यंबकेश्वर नगरपालिका.<br>मनपा, नाशिक.<br>सा.बां. विभाग, नाशिक.<br>MSRDC, नाशिक.<br>जिल्हा परिषद, नाशिक.<br>NMSSDCL, नाशिक |
| 16 | कुंभमेळा आणि स्थानिक पर्यटन या दृष्टिने प्रशासनाला मदत करु शकणारे इच्छुक संस्था आणि व्यक्ती यांची यादी तयार करावी. | त्र्यंबकेश्वर नगरपालिका.<br>मनपा, नाशिक.<br>पोलीस विभाग (शहर आणि ग्रामीण).<br>MTDC, नाशिक. |

सर्व विभागांनी ३ आठवड्यात त्यांचेशी संबंधित बाबींचा सविस्तर प्रस्ताव तयार करुन निवासी उपजिल्हाधिकारी, नाशिक यांचेकडे सादर करण्यात यावा.

त्यानंतर मा. जिल्हाधिकारी, नाशिक यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून मा. अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने बैठक संपल्याचे जाहीर केले.

## 'सिंहस्थ कुंभमेळा' सन 2027 बाबत दिनांक 08 जुलै 2024 रोजी आयोजित करण्यात आलेल्या बैठकीचे इतिवृत्त.

नाशिक व त्र्यंबकेश्वर येथे सन 2027 मध्ये 'सिंहस्थ कुंभमेळा' चे आयोजन करणेसाठी डॉ. प्रवीण गेडाम, विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचे अध्यक्षतेखाली दिनांक 08 जूलै 2024 रोजी दुपारी 02.30 वाजता विभागीय आयुक्त कार्यालयातील समिती कक्षात नाशिक महानगरपालिकेने तयार केलेल्या आराखड्याबाबत संपन्न झालेल्या आढावा बैठकीसाठी खालील अधिकारी उपस्थित होते.

- श्री. अशोक करंजकर, आयुक्त नाशिक महानगरपालिका, नाशिक
- डॉ. राणी ताटे, उपआयुक्त (महसूल)
- श्री. मच्छिंद्र भांगे, उपआयुक्त (नियोजन)
- श्री. नितीन पवार, सहआयुक्त (न पा)
- श्री. श्रीनिवास कुऱ्हे, उपआयुक्त (नगरपालिका शाखा)
- श्री. राजेंद्र वाघ, निवासी उपजिल्हाधिकारी
- उपस्थित विभाग प्रमुख व इतर अधिकारी/ कर्मचारी यांची यादी सोबत जोडण्यात आली आहे.

मा. विभागीय आयुक्त, नाशिक यांनी बैठकीस उपस्थित सर्व अधिकारी/ कर्मचारी यांचे स्वागत केले व तद्नंतर महानगरपालिकेने तयार केलेल्या आराखड्याचे विभागनिहाय सादरीकरण करण्याच्या सूचना दिल्या. सादरीकरणात मांडलेल्या मुद्दांबाबत सविस्तर चर्चा करुन मा. अध्यक्ष महोदयांनी खालीलप्रमाणे निर्देश दिले. तसेच या शिवाय दिलेल्या इतर सुचनांची देखील अंमलबजावणी करावी.

| अ.क्र. | विभागीय आयुक्त यांनी दिलेले निर्देश | अंमलबजावणी करणारा विभाग/ अधिकारी |
|---|---|---|
| 1 | महानगरपालिकेच्या प्रत्येक विभाग प्रमुखाने काम निहाय प्राधान्यक्रम (Prioritisation) निश्चित करावी. साधुग्राम व फायर ब्रिगेड साठी प्रथम प्राधान्यक्रम देण्यात येवून इतर कामांसाठी प्रत्येक विभागाने कामनिहाय प्राधान्यक्रम निश्चित करावा. | संबंधित विभाग प्रमुख, नाशिक महानगरपालिका |
| 2 | महानगरपालिकेने आराखड्यात अंतर्भुत कामांसाठी लागणाऱ्या निधीच्या स्व:हिस्स्याचे प्रमाण कळवावे. | |
| 3 | इतर योजनेमधून निधी उपलब्ध होत असलेल्या कामांचा समावेश आराखडयामध्ये करण्यात येऊ नये. तसेच कार्यालयीन साहित्य खरेदी अथवा अशा प्रशासकीय खर्चाचे प्रस्ताव आरखडयात शक्यतो प्रस्तावित करु नयेत. | |
| 4 | साधुग्रामची जमिन अधिग्रहित करण्यासाठी आणि/ किंवा भाड्याने घेण्यासाठी विविध पर्यायांचा अभ्यास करून अहवाल सादर करावा. | |
| 5 | PM गतीशक्ती च्या पोर्टलवर महानगरपालिकेची माहिती अद्ययावत करण्यात यावी. | |

| अ.क्र. | विभागीय आयुक्त यांनी दिलेले निर्देश | अंमलबजावणी करणारा विभाग/ अधिकारी |
|---|---|---|
| 6 | inner, outer पार्किंग व घाट याप्रमाणे जागा निश्चित करावी व colour coding करुन नकाशावर दाखवणेत यावे. | संबंधित विभाग प्रमुख, नाशिक महानगरपालिका |
| 7 | रस्त्यांचे नियोजन करताना दुतर्फा मोठे झाडे लावण्याचे देखील नियोजन करणे. | |
| 8 | जुन्या पुलांचे Structural ऑडिट त्वरित करुन नवीन पुलांचे (Bridges) बांधकामाचा प्राधान्यक्रम निश्चित करणे. यासाठी मनपाचा निधी खर्च करावा. | |

(मनपा, नाशिकशी संबंधित दि. 08 आणि 10 जुलैच्या बैठकीतील काही सामायिक सूचना दि. 10 जुलैच्या इतिवृत्तातदेखील नमूद आहेत).

सर्व विभागांनी ३ आठवड्यात त्यांचेशी संबंधित बाबींचा सविस्तर प्रस्ताव तयार करुन निवासी उपजिल्हाधिकारी यांचेकडे सादर करण्यात यावा.

त्यानंतर निवासी उपजिल्हाधिकारी, नाशिक यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून मा. अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने बैठक संपल्याचे जाहीर केले.

**बैठकीस उपस्थित अधिकारी/कर्मचारी (दि. 08 जूलै 2024)**

| अ.क्र. | नाव | पदनाम | कार्यालयाचे नाव |
|---|---|---|---|
| 1 | डॉ. प्रवीण गेडाम | विभागीय आयुक्त, नाशिक | नाशिक विभाग, नाशिक |
| 2 | श्री.अशोक करंजकर | आयुक्त | मनपा नाशिक |
| 3 | श्री. मच्छिंद्र भांगे | उप आयुक्त (नियोजन) | नाशिक विभाग, नाशिक |
| 4 | श्री. राजेंद्र वाघ | निवासी उपजिल्हाधिकारी | जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक |
| 5 | श्री. नितीन पवार | सह आयुक्त (न.पा) | नाशिक विभाग, नाशिक |
| 6 | डॉ. राणी ताटे | उप आयुक्त (महसुल) | नाशिक विभाग, नाशिक |
| 7 | डॉ. श्रीनिवास कु-हे | उप आयुक्त (न.पा.) | नाशिक विभाग, नाशिक |
| 8 | श्री. अजित निखत | उप आयुक्त | मनपा नाशिक |
| 9 | डॉ. तानाजी चव्हाण | मेडीकल ऑफिसर | आरोग्य विभाग |
| 10 | डॉ. प्रशांत शेटे | सहा. मेडीकल ऑफिसर | आरोग्य विभाग |
| 11 | श्री. गणेश मैंद | कार्यकारी अभियंता | मल: निसारण |
| 12 | श्री. राजेंद्र शिंदे | कार्यकारी अभियंता | मल: निसारण |
| 13 | श्री. विवेक भदाणे | उद्यान अधिक्षक | मनपा नाशिक |
| 14 | श्री. हर्षल बाविस्कर | उपसंचालक, नगररचना | नगररचना, नाशिक |
| 15 | डॉ. पलोड | घनकचरा विभाग प्रमुख | आरोग्य विभाग |
| 16 | श्री. रविंद्र धारणकर | कार्यकारी अभियंता | पाणी पुरवठा |
| 17 | श्री. संदेश शिंदे | कार्यकारी अभियंता | सार्वजनिक बांधकाम |
| 18 | श्री. अविनाश धावटे | यांत्रिकी विभाग | यांत्रिकी विभाग |
| 19 | श्रीमती स्मिता झगडे | अपर आयुक्त | अपर आयुक्त (सेवा) |
| 20 | श्री. प्रदिप चौधरी | अपर आयुक्त (वने) | अपर आयुक्त (वने) |
| 21 | डॉ. पी.एम. सोनवणे | पशुसंवर्धन अधिकारी | पशुसंवर्धन कार्यालय नाशिक |
| 22 | श्री. ऐ.एस गायकवाड | कार्यकारी अभियंता | मनपा नाशिक |
| 23 | श्री. एस.टी. जाधव | कार्यकारी अभियंता | मनपा नाशिक |
| 24 | श्री. मिलींद बांड | यांत्रिकी विभाग प्रमुख | यांत्रिकी विभाग |
| 25 | श्री. सचिन जाधव | कार्यकारी अभियंता | सार्वजनिक बांधकाम |
| 26 | श्री. नितीन पाटील | कार्यकारी अभियंता | गुणवत्ता विभाग, मनपा |
| 27 | श्री. गायकवाड बळवंत | मुख्य लेखा परिक्षक | मनपा नाशिक |
| 28 | श्री. लोणे किसन | नगररचनाकार | भुसंपादन विभाग |
| 29 | श्री. कृष्णा पडोळ | उपलेखापरिक्षक | उपलेखापरिक्षक |
| 30 | श्री. दत्तात्रय पाथरवट | मुख्य वित्त व लेखा अधिकारी | मनपा नाशिक |
| 31 | श्री. नितीन धामणे | सहायक | विद्युत विभाग व संगणक विभाग मनपा |
| 32 | श्री. अनिल कोटकर | नमामि गोदा | नमामि गोदा |
| 33 | श्री. अजय कमोद | लेखापाल | मनपा नाशिक |
| 34 | श्री. श्रीकृष्ण देशपांडे | आपत्ती व्यवस्थापन अधिकारी | आपत्ती व्यवस्थापन कार्यालय, नाशिक |
| 35 | श्री. बी.टी. गोळवणे | महसुल सहायक | जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक |
| 36 | श्री. विठ्ठल मोराणकर | नायब तहसिलदार | जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक |
| 37 | श्री. योगेश सोमवंशी | सहा. संशोधन अधिकारी | उपआयुक्त (नियोजन) कार्यालय, नाशिक |
| 38 | डॉ. मयुर पाटील | उप आयुक्त अतिक्रमण | मनपा नाशिक |
| 39 | श्री.मु द्यसिर महोम्मद | आपत्ती व्यवस्थापक | अग्निशमन विभाग |